संत तुकाविप्रांनी अनेक विषयांवर अभंग रचले आहेत . संत तुकाविप्रांचे चरित्र महान संत चरित्रकार व कवी राजाराम प्रासादी (भक्त मंजीरी माला या ग्रंथाचे कर्ते ) लिहीले आहे

संत तुकाविप्रांबददल कवी राजाराम प्रासादी म्हणतात,

काय वर्णिजे तुकाविप्रा । ज्याचे भाषण जेवी क्षीप्रा ।
रास करीती सदा छप्रा । किंवा वृक्षा तळवटी ॥
जन्मांतराचे योगे करुन । सद्‌गुरु लाभले ते चि पूर्ण ।
जेका बावाजी चैतन्य अवतार धन्य विप्रनाथ ॥

सर्व भक्तांना हेच मागणे , संत तुकाविप्र यांचे साहीत्य म्हणजे समाजाचे
आम्हावर असलेले फार मोठे ऋण आहे , ते स्विकारण्यासाठी आपला सहभाग
तेवढाच महत्वाचा आहे. याच भावनेने राजाराम प्रसादी कृत संत तुकाविप्र
चरित्र श्री विठ्ठल चरणी समर्पण

|| श्री गणेशाय नमः || श्री रामसमर्थ ||
जय आदिसर्वेश्वरा | गुणातीत परात्परा ||
व्यापक तू सर्वाधारा | सद्गुरुवरा सिद्धमूर्ति | ||१||
तूंचि स्वामिया गुणांचा ईश | या लागी नाम तव गणेश |

नातरी ठाईचे अविनाश | परि विशेष लीला हे ||२||

देवा तुमची पराशक्ती | ते चि माया सरस्वती |
सकळ कळेची उत्पत्ति | पावले स्थीती चराचर ||३||
नमो ऐसिया विलासीया | सर्वोत्तमा निज आत्मया |
सच्चिदानंद पदत्रया | नटसी ठाया आपण तू ||४||

होसी देव आणि भक्त गुरु शिष्य प्रेमभरीत |
युगायुगी संभवत | भक्त अद्‌भुत भोगावया ||५||
तया भक्तविण पाहे | गोमटे तुम्हा नसे कांही |

या लागी प्रगट होउनी ह्रदयी । वदवि ते ही भक्त मंजीरी ॥६॥

संत प्रियकर जानकीजीवना । हे चि प्रार्थना आणिजे मना ।
जन्मो जन्मी साधुस्तवना । रंगवी रसना चरीत्रगुणी ॥७॥
पंढरीनिवास भक्त वत्छल । ईया विनवणी संतोषले ।
सांगती स्वमुखे भक्तमाले । बोलविति सकल मुळिचे पै ॥८॥

तरी अवधान द्यावे श्रोतिये । येंकाग्रता करुनि ह्रदय ।
श्रवणें चि लाहिजे स्वात्मकार्य । पाविजे अक्षयपदाप्रति ॥९॥
श्री तुकाविप्र स्वामींची कथा । अत्यंत प्रिय जे भगवंता ।

वर्णिजेल ते चि आता | ठेउनी माथा सिद्धपदी ||१०||

युगायुगीं देवासवे | अवतरला जो निजवैष्णव |
अनुक्रमेसी ते सर्व सांगीजेल भाव गुरुकृपे ||११||
कृतायुगी प्रल्हाद जाहाला तेथे नारदे उपदेशीला |
भागवती प्रसिद्ध हे लीला | वर्णिला भला स्वानुभव ||१२||

त्रेती वालीचा तो कुमर | अंगद नामे महावीर |
मग बोधीले साचार | वायूपूत्रे श्री मारुति ||१३||
द्वापारी तो उद्धव जाहला | यादव वौंषी जन्मला |

सर्वोत्तमे अनुग्रह केला । वर्णिले तयाला व्यासानी ॥१४॥

कलिमध्ये तोची उद्धव । भक्त जाहला नामदेव ।
जयासंगे देवाधीदेव जेविले भाव पाहुनी ॥१५॥
विसोबा खेचर हा संत । जया लागी प्रबोधीत ।
भजनरंगी रंगले चित्त । धन्य भक्त ते नामदेव ॥१६॥

चरीत्रे केली नानापरी । काय सांगु ते वैखरी ।
गाय उठली यें वना घरी । स्मरता हरी तात्काळ ॥१७॥
सुवर्णाचे श्री पंढरीक्षेत्र । भक्त छळकासी आणिले  अनुभवा पवित्र

परिसा भागवत विचित्र । वाळुचे स्वतंत्र परिस दाविले ॥१८॥

गोरोबाचे फुटले हात । कीर्त नी बाळ आले रांगत ।
पुष्पवृष्टी केली सत्य । जाहला आनंद  अद्‌भूत तो ॥१९॥
नामयाचे घरी विपत्ति । हे जाणुनी रुक्मिणीपती ।
विठ्ठल शेटे होउनी जगती । गोणी लोटिती द्रव्याची ॥२०॥

परी तो विरक्तीचा पुतळा । द्रव्य लुटले ब्राह्मणाला ।
ऐशा पाहता अनेक  लीला । वर्णियेल्या ग्रंथांतरी ॥२१॥
पाहा या निवृत्यादि ज्ञानेश । तीर्थीवळींचे करुनी मीस ।

समागमी विशेष | प्रेमसुखास लाभले पै ||२२||

शतकोटी करुनी अभंग | भावे पुजावा पांडुरंग |
हा ही संकल्प करीता चांग | पूर्वी श्रीरंग भक्तीबळे ||२३||
ऐसा नामा प्रेमळ भारी | नाम महात्म्य पृथ्वीवरी |
प्रगटविले जेणे जीवोपकारी | कीर्ति थोरी पै याची ||२४||

पुढे नामयाचा जाहला तुका | हे तो प्रसिद्ध आहे लोका |
ज्याचे वैराग्य पाहता देखा | सनकादीका विस्मय मनी ||२५||
अगाध भक्ती वाढविली | भवार्णवी नौका जाहली |

होउनी ठेला साउली । सर्वत्र निवाली नारीनर ॥२६॥

सकळ साधुंचा जाहला कळस । बोलणे खुंटले निःशेष ।
अनुभव आणिले अंगास । काही तयास न राहीले ।
ते हि स्तवन करुनी भले । पुजिला विठ्ठल सर्वात्मा ॥२८॥

सेवटी पाहा केले काय । विमानी बैसला जडदेह्य ।
जगा दाविले प्रत्यय । तरुणोपाय नानापरी ॥२९॥
लोक लाविले भावार्थासी । भजनमार्ग दाविला त्यांसी ।
हळुहळु स्वरुपासी । पावावयासी येकसरा ॥३०॥

सकळ लाहोनी कृतकृत्यता । जीव तारीलें बहु तत्वता ।
आपण निघोनी वैकुंठंपंथा । चालिले सर्वथा तुकाराम ॥३१॥
उर्ध्वपंथे जाता जाण । अमरावतीचें देखिले स्थान्
तेथ पुरंधर येऊन । केले नमन त्या साधवा ॥३२॥

नानास्थळे मनोहर । दाविली अमृत सरोवरे ।
तेथे न रमे वैष्णववीर । राजसी उपच्यार जाणुनी ॥३३॥

तुकोबा म्हणती मानसी । जरी रहावे वैकुंठासी ।
तरी पंढरीचे सुखासी । तुळणेंसी न घडे ते ॥३४॥

मागे परतावयाचे व्याज । स्वकर्मे स्फुरले चित्ती सहज ।
तेव्हां विनवी देवराज । श्रीपादरज वंदोनी ॥३५॥
म्हणे मजला अनुग्रह द्यावा । मी कर्मभूमीसी जन्म घ्यावा ।
लोक समोह तारावा । सुकाळ करावा भक्तीचा ॥३६॥

मग तुका म्हणें देवेंद्रास । अवतार घेणे आहे आम्हास ।
तुजहि करु उपदेश । राहीले विशेष करणे ते ॥३७॥

ब्रह्मयोनीत जन्म घेणें । मुक्तत्व शोभे तेंणे गुणे ।
सिद्धांत वेदी ऐसा पूर्ण । करावे प्रमाण त्या वाक्या ॥३८॥

आणि शतकोटी अभंगाची । बाकी फेडीली स्तवनाची ।
परी राहिली नेमाची । सळईची पंचोत्तरी ते ॥३९॥
भजनतृप्ती नाही मन । कळाया जनी ऐंशी खुण ।
टाळ टाकीला विमानातून । पाहिला नैने सकळीक॥४०॥

हे काय ठाउके इतरा । मागील संगती या पामरा ।
या लागी निर्णयो केला खरा । पूजीती बरा टाळ तो ॥४१॥

असो कृपामूर्ति सद्गुरु नाथ । बाबाजी चैतन्य जे प्रख्यात ।
तयाचा उपदेश जाहला सत्य । स्वप्नाआंत तुकयासी ॥४२॥

तयेकाळी पावशेर । मागितले तूप गुरुवरे ।
ज्याग्रतेसी येता निर्धारे । राहीले खरे देणें ते ॥४३॥
ऐसे सुरेशा सांगून । भूतळासी निघाले जाण ।
तेंव्हा पवित्र आपुली खुण । दीधली पूर्ण देवराजे ॥४४॥

विलोमरेफ संगती । विप्रत्व आले वज्त्राप्रती ।
मग तुकाविप्र नामे जन्म धरीती । अवतार क्षीती श्री तुकोबा ॥४५॥

आता कोणते स्थळी कोण ग्राम । शाखा वेद आचरण धर्म ।
ते साकल्य ऐकीजे प्रेम । यथानुक्रमे अनुवादू ॥४६॥

अंजनवती नामे नगरी | गोदावरीचे दक्षिणतिरी
महावैष्णव निर्धारी | धन्य संसारी गुरुभक्त ||४७||
ऋग्वेदशाखा आश्वलायन | विप्रनाथ नामे बाबाजी चैतन्य |
अवतरला जो माहामान्य | श्री येकनाथ पूर्ण सांप्रदाई ||४८||

तयाची कन्या पुण्यराशी | अर्पिली ती रहिमपुरी द्विजासी |
त्या पासव जन्म तुकयासी | निश्चयेसी सहज तो ||४९||

मातामह तो विप्रनाथ जाण | जन्मांतरीचा सद्‌गुरु पूर्ण |
असो तये कुळी सच्चीदघन | घेतला जेणें अवतार ||५०||

गर्भीच असता जननीप्रती । भगवत भजनी रंगली वृत्ति
सन्निध जियेचे श्री रघुपति । दिवाराती हरिभजन ॥५१॥
नऊ मास होताची पूर्ण । प्रसवली सुपुत्र गुणनिधान ।
तुकाविप्र सकळजन । वदती जाण यालागीं ॥५२॥

दिवसेंदिवस पाहता बाळा । विचित्र दिसे प्रेमकळा ।
भजन करीतो वेळोवेळा । दिसे सावळा या लागी ॥५३॥

नातरी जनासारींखे । माता बोलती जरी कौतुके ।
कदा न रहे देख । रुदन दुःखे करीतसें ॥५४॥

रामकृष्ण हरी गोंविद | हेची सदा जननी वदे |
तेणें पावोनी विषद | खेळत सिद्ध असावे ते ||५५||
पुढे चि एक वर्षानीं | अर्भके केली असे करणी |
श्री पुंडलीक विठ्ठल म्हणूनी | गर्जिनले वाणी प्रथमता ||५६||

मग निरंतर तोचि व्यास | विठ्ठल विठ्ठल म्हणत असे |
दुजा खेळ आन नसे | रंगले मानस भजनीं सदा ||५७||

ऐशा परी बाळ लीला | श्री तुकाविप्र करीता जाहला |
पुढे पित्याने व्रतबंध केला | तो सोहळा अनोपम्य ||५८||

ऋणानुबंधें करुन | पुर्वील कलत्र वरीले तेणे |
अपराध घडले मागे म्हणे | करा उद्धरण  या जन्मी ||५९||
संतती संपत्ती न लगे काही | चित्त वसो तुमचे पाई |
से प्रकारे विनविता पाही | सद्‌गद ह्रदई तुकाविप्र ||६०||

अनुग्रह करुनी स्वस्त्रीयेसी | मेळविले सस्वरुपाही |
निमग्न जाहली ती सेवेसी | भोगी देहयासी वैराग्य ||६१||

पुढे उभयता दोघे स्वईछे | तीर्थे करीती सकळ स्वस्थ |
मुगुटी जयाचे मयूरपीछ | निरईछे तया आठविती ||६२||

काय वर्णिजे तुकाविप्रा । ज्याचे भाषण जेवी क्षीप्रा ।
रास करीती सदा छप्रा । किंवा वृक्षा तळवटी ॥६३॥
जन्मांतराचे योगे करुन । सद्‌गुरु लाभले ते चि पूर्ण ।
जेका बावाजी चैतन्य अवतार धन्य विप्रनाथ ॥६४॥

होता जयाची निजभेटी । स्वरुपी जडली तात्काळ दृष्टी ।
हारपोनी गेली असता सृष्टी । जगजेठी दिसतसे ॥६५॥

कर्णी पडताची मंत्राक्षर । तुकाविप्र चढले त्रिकुट शीखर ।
सहस्त्रदळी होवूनी स्थीर । सोहंविचार स्फुंदति पै ॥६६॥

शेखी अहंसोहंभान | हे हि विराल जेथे जाण |
लागली समाधी स्वानंदघन | अनिर्वाच्या पूर्ण ते सुख ||६७||
नाही आठवू देहयाचा | परेसीं मुरडल्या चारी वाचा
घोट भरला ब्रह्यांडाचा | मीनली साचा स्वरुपावरी ||६८||

अनुभव अनुभवी विराला | आत्मा सर्वत्र होवूनी ठेला |
तुका विप्र उपदेशीला | सद्‌गुरु भेटला विप्रनाथ ||६९||

दिनत्रय निर्विकल्प | समाधी भोगीतो योगाधीप |
आत्मशेजे लागली झोप | उन्मनी दडपे पाय तयाचे ||७०||

मग श्री गुरुची युक्तीद्वारा । तुर्ये अवस्थेच्या नेहता घरा ।
प्राण उतरोनी हृदयगाभारा । इंद्रिय शरीरा सचेतन ॥७१॥
परी स्वानंदडोही चुबकळी । सस्वरुपी जडोनी ठेली ।
माईक विषय सांडुनी गुरळी । राहाटती सरळी नित्यकर्म ॥७२॥

नेत्र पाहाती जो जो पदार्थ । तो तो दिसे पंढरीनाथ ।
शब्द पडती ते श्रवणाते अर्थरुप ते सकळ पै ॥७३॥

रसना रंगली निजात्मरसे न सेवी कदा द्वैत बाकस ।
जगत्र हेमी येककस । भरला अविनाश जगदात्मा ॥७४॥

गंधासी गंधत्व जेथोनी । तोची बैसला घ्राणासनी ।
रोमरंध्री त्वचेंसदनी । स्पर्शत्व स्पर्शनी सर्वोत्तमु ॥७५॥
टाकिला मानसे ज्या संकल्प । कैचा तेथे मग विकल्प ।
असो जड समाधी सद्गुरुकृपे । तुकाविप्रे विसर्जिली ॥७६॥

इंद्रियबळ लाहोन । नवविध प्रकारे करीती भजन ।
मोहिला जेणे नारायण । सब्राह्य जाण तिष्ठतसे ॥७७॥

मग पंढरीसी निघाले । तुकाविप्र समर्थ भले ।
तये वेळी अडवे आले । श्री विठ्ठल परमात्मा ॥७८॥

नारदादिक श्री वनमाळी । हर्षे सांगती वाजवून टाळी ।
म्हणती तुकाराम भूमंडळी । अवतरली संतमाये ॥७९॥
तरी आता लाग वेगी । चला सामोरे तया लागी ।
ऐसे बोलोनी श्रीरंगी । स्वये वेगी पाच्यारीले ॥८०॥

मग संत समुदाव । सहित निघाले देव ।
ध्वज पताका गर्जती सर्व । घोष अपुर्व होतसे ॥८१॥

गजर करीत आनंदेसी । सामोरे पातले तुकाविप्रासी ।
नमस्कारीती तया स्थळासी । पवित्र भूमीसी यात्रेकरु ॥८२॥

देवभक्त मिळता मीळनी । तया सुखा कोण वर्णी ।
हर्ष न माये त्रिभुवनी । गाती गाणी स्वानंदे ॥८३॥
समारंभे गजर करीत । गेले पंढरी क्षेत्रात ।
नमन करुनी पुंडलीकाते राउळात प्रवेशले ॥८४॥

तुकाविप्र गरुडपारी । भजन करीता प्रेमभरी
तन्मय जाहले भक्तविहारी । पाहती अंबरी देव सकळ ॥८५॥

विमानी बैसुनीं सुरे । अवलोक्तिा पंढरीं विलास ।
पातला सहजी भूमीत । कीर्तनरस सेवावया ॥८६॥

ती कथा अत्यंत चोख | पुढे वर्णीलीअसे देख |
परिसोत सदा भाविक नाशी दुःख सकळ ही ||८७||
श्री रामदास अवतार भूमंडळासी | सद्‌गुरुसिद्ध जो कृपाराशी |
देह्यवृंदावन हृत्कोषी | स्थापीले तुळसी स्फुर्तीसी ते ||८८||

सिद्धांमृत वर्षता जीवन | भक्त मंजीऱ्या दाटल्या पूर्ण |
तयाची माळ करुनी जाण | होतसे अर्पन श्री रघुवीरा ||८९||

प्रेमरजू घेवूनी हाती गुंफीयेली वैखरी निगुती |
पंढरी निवासा परमप्रीती | राजारामी युक्ती समर्पीली ||९०||

भक्तमंजरी माला ग्रंथ । श्रवणेंची पुरती मनोरथ ।
तुकाविप्र  आख्यानाते । आध्याय समाप्त जाहला हा ॥९१॥

श्री कृष्णार्पणमस्तु ॥१॥ शुभंभवतु ॥ श्री रामचंद्रार्पणमस्तु । श्री पांडुरंगार्पणमस्तु ॥

## अध्याय २ रा

श्री गणेशाय नमः ॥ श्री राम समर्थ ॥
जय सद्‌गुरू पंढरी निवासा । निजआत्मया रूक्मिणीविलासा ।

चराचरी उभा सरीसा। श्री जगदिशा विटेवरी ॥१॥
चिद्गगन ते पंढरपुर। सोहंध्वनि कीर्तन गजर।
भावे भजती वैष्णववीर। गरूडपारी विवेक तो ॥२॥

माहाद्वारी चौघडा। अनुहात नाद होतसे पुढा।
अखंड वाहे भडाभडा। ते चि धडपुडा ज्ञानोदक ॥३॥
चिन्मय वाळुवंटी देख। स्वानुभव शोभे पुंडलिक।
निरंतर होतसे सुख। किर्तन चोख ब्रह्मस्थिती ॥४।

द्वैत भयाची करीता वारी। नरदेह्ययात्रा जाहाली बरी।
अवघाची जेथे नटला हरी। धींवसापरी पुजेचा तो ॥५॥

आतां पुज्य पुजकपण । हे तो नुरे कांहीच जाण ।
मानसी आवडी तरीच पुर्ण । अर्चन करणे यथामती ॥६॥

या लागी विनवणी जन्मोजन्मी । हे चि श्री गुरूपादपद्मी ।
प्रगट होउनी अंतरयामी । मालिके रामी ग्रहण किजे ॥७॥
प्रार्थीता ऐसा सिद्धेश्वर । स्फुरवी बुद्धसी कथासार ।
ते चि एका श्रोते सारे । नारी नर अबालवृद्धे ॥८॥

पूर्वाध्याई तुकाविप्र । स्वरूपी रंगले सद्‌गुरू कृपे ।
पंढरीसी जाता वैकुंठाधीष । चतुरभूजरूपे आडवे आले ॥९॥
हाती धरूनी रूक्मिणीपति । घेउनी गेले राउळाप्रती ।

वर्णु जातां सरस्वती । ते सूखाप्रती अनुपम्य ।।१०।।

आतां श्री गुरूभक्ती कराया । सुरेश अवतरला भुठाया ।
नमन करूनी सिद्धपाया । सांगितले तया ऐका ते ।।११।।
श्री सोपानदेवाचे स्थान । सासवडनामे  क्षेत्र पुर्ण ।
तेथील पवित्र ब्राम्हण । आश्वलायन ऋग्वेदी ।।१२।।

पुरंधर ज्याचे उपनाम । पुरंधर पावला तेथे जन्म ।
पुण्यभूमी धन्यग्राम ।विप्रोत्तम धन्य ते ।।१३।।
मग तो देवेश पित्याने । तुकाविप्रासी केला अर्पन ।

पूर्वील संकेत जाणून । केले पालन श्रीगुरुंनी ॥१४॥

मृत्यूलोकी पांडुरंग । नाम पावला शचिरंग ।
कां जे घडला स्वर्गी संग । भवभंग तुकयाचा ॥१५॥
पंढरी माहात्म ऐकुनी । रंगली वृत्ती पांडुरंग स्मरणी ।
अवतार घेतची मेदिनी । नामाभिदानी त्या प्राप्ती ॥१६॥

असो इंद्रांशमूर्तिने पाहतां तुका । वेधले मानस चरणी देखा ।
इच्छितसे अनुभव निका । शाश्वतसुख पावावया ॥१७॥
तुकाविप्र स्वामीप्रती । हात जोडीले दोन्ही निगुती ।

दंडायमान पडले क्षीती । नमन करीती साष्टांग ॥१८॥

म्हणे नहाराजा दिनदयाळा । दूर करी या भवभयाला ।
नाही शक्ती तरावयाला । मायानदीला दूर्धर हे ॥१९॥
कामक्रोधादि जळाचरे । गिळूं पाहती हा किंकर ।
तरी देउनी कृपाकर । काढी बाहेर तू समर्था ॥२०॥

शिष्यमयूर करुणाघना । भक्तचकोर रोहिणीरमणा ।
द्वैततमारी सहस्त्र कीर्णा । हे चि चरणा विज्ञाप्ती ॥२१॥
प्रार्थीता ऐसे सत्शिष्य पांडुरंग नामे इंद्रांश ।

संबोखोनी परमउल्हासे | बैसविले असे सन्मुख पै ||२२||

शिष्य मुमुक्षु पूर्णचंद्रा | पाहुनी भरते कृपा समुद्रा |
प्राप्त झाले तुकाविप्रा | अवतार इंद्रा उद्धराया ||२३||
सांप्रदायक्रमे ते चि क्षणी | मंत्रोपदेश केला कर्णी |
संतोषाने वरदपाणीं | बाप बाप वदनी वदती पै ||२४||

तै पासुनी सर्वत्र जण | बापु ऐसे वदतीं जाण |
नातरी मुळीचे अभिवादन | पांडुरंग पूर्ण नाम तया ||२५||
असो सद्‌गुरुसमर्थ तुकाविप्रानी | उपदेशिला तो शिष्य चुडामुनी |

इंद्र अवतार जो मेदिनी । बापु मेदिनी धन्य तो ॥२६॥

सर्वात्मतेचे भद्रासन । अमरपुरी ब्रह्मपूर्ण ।
जेथे उन्मत झुले वारण । स्वानंद जाण ऐरावती ॥२७।
रमा उर्वशी तिलोत्तमा । दया घृती शांती क्षमा ।
सुलीनदशा मुख्य परमा । ते चि रामा इंद्रांयणी ॥२८॥

इंद्रिय मेळीत देव । आत्माराम अमरराव ।
ज्ञानसंपत्ती फळ वैभव । भोगी सदैव ते गुरुकृपे ॥२९॥
बापुविप्र वदती जन । पांडुरंग ज्या नामाभिदान ।

स्वरुपस्थितीसी लाहोन | केले अर्चन श्री गुरुंचे ||३०||

मग जयाने सेवेठाई | वय वेचीले असे पाही |
वैराग्य वरीले देही | भजन हृदई करीतसे ||३१||
परी जन्मांतरीचा स्वभाव पहीला | विषयविलास न सुटे अबळा |
पुर्वील संबंधे विवाह जाहाला | सकळ घडला उपच्यार ||३२||

निष्ठा पाहुनी श्री गुरुनी स्फूर्तीसी प्रगट जाहले वदनी |
सदा रंग ज्या कीर्तनी | नामस्मरणीं धन्य तो ||३३||
पंढरीसी मठ केला | प्रगटविले सांप्रदायाला |

भक्तीध्वज तेणें रोविला । पाहता काळा भय सुटे ॥३४॥

ठाई ठाई उत्सवासी । जना लाविले सन्मार्गासी ।
वाढविले गुरुभक्तीशी । लोकत्रयासी प्रसिद्ध जो ॥३५॥
आषाढी कार्तिकाचा । नेम साजिरा अत्यंत ज्याचा ।
ऋणीं केला देव साचा । पंढरीचा राणा पै ॥३६॥

चंद्रभागेचे तटी । श्री पुंडलीकाचे पृष्ठी ।
कीर्तन करीता वाळंवटी । होये दाटी बहुसाल ॥३७॥
पौर्णिमेसी गोपाळ काला । होत असे त्या स्थळाला ।

दुर्लभ प्रसाद अमरादिकाला । इच्छिती लाह्याला सकळ ते ॥३८॥

ऐसे प्रेमाचा पुतळा । बापुविप्र सत्‌शिष्य भला ।
देव चि जेणे वेडा केला । तिष्ठे सावळा मागेपुढे ॥३९॥
आणिकही शिष्य अपार । करीते जाहले तुकाविप्र ।
भूमंडळामाजी पवित्र । मोक्ष सत्र घातिले पै ॥४०॥

श्री कृष्णातीरा माझारी । तारगांव उत्तम नगरी ।
तयासन्निध वनबदरी । द्वैततमारी राहती तेथे ॥४१॥
श्री पांडुरंगमूर्ति स्थापीन । करीती सदा अनुष्ठान ।

मुळीचा सहजी योग पूर्ण । भगवद्भजन सर्वदा ॥४२॥

अष्टमहा सिद्धी लागती पाई । वैराग्य विलसे ज्याचे देही ।
प्रतिष्ठेचा वास हृदयी । अनुमात्र पाही नसे सदा ॥४३॥
प्रतिष्ठा ते शूकरीविष्ठा । हे जाणवले जया शिष्ठा ।
काय दाउनी इतर चेंष्टा । नाहीं निष्ठा परमेश्वरी ॥४४॥

घेऊनी वरता संतवेष । देती जगासी उपदेश ।
कैचा अंतरी ज्ञानलेश । सावकाश विषय भोगीती ॥४५॥
माळा मुद्रा जटाभार । मिरविती अंगी भगवी चिरे ।

कीर्तन करीती घरोघर । रांडापोरे भोंदावया ॥४६॥

नाम विक्रयाचे पाप । न जाये तीर्थाचेनी बापे ।
जया होईल अनुताप । ब्रह्मस्वरुप तो पावे ॥४७॥
असो तुकाविप्र ज्ञानराशी दुजी उपमा नाही त्यासी ।
वैराग्य लागे पायासी । क्षमा दासी ज्याची पै ॥४८॥

भिक्षेचे पीठ आणावे । खडकावरी ते मेळावे
पानगे करुनि अर्पावे । वासुदेव सर्वाभूति ॥४९॥
अतिथी येता स्वभावे । वाढुनी तया मग जेवावे ।

फळशेंगादि पदार्थ देता भावे । संतोषावे तयावरी ॥५०॥

अनन्य लागता पायाशी । नाममंत्र सांगतीं त्यासी ।
न वांछीती उपच्यारासी । स्वरुपासी मेळविती ॥५१॥
नातरी इतर द्रव्यभोंदू । म्हणविती जगी उगेचि साधु ।
शिष्या न भेटे कदा गोंविदु । सदा बध्दु विषई तो ॥५२॥

असो तुकाविप्र अवतार तुकयाचा । प्रसिद्ध जाहला असे साचा ।
तया संगे वैकुंठाचा । पंढरीचा देव नाचे ॥५३॥
भवसिंधुवरी स्पष्ट । केली जेंणे पायवाट

भक्तप्रेम वसवीली पेठ | केली लूट नामाची ||५४||

तीर्थ मीसे भ्रमण करीत | आले सासवड नगरात |
श्री सोपानदेव समाधीते | नमन निरुते केले पै ||५५||
तेथे अद्वय वोवरीमाजी | तुकाविप्र राहिले सहजी |
जीवोद्धारी आवडी ताजी | भजनकाजी प्रेमळ ते ||५६||

रात्रंदिवस कीर्तन गजर | दुमदुमीले सासवड नगर |
भक्तीशी लाविले नारीनर | निजात्म शिखर चढावया ||५७||
पुढे तुकाविप्र स्वामींचे मानसी | आठवले पूर्ण जावे काशीसी |

स्नान करुनी भागीरथीशी । विश्वेश्वरासी पुजावे ॥५८॥

तव रात्री सोपानदेव सांगत । येथे भागीरथी आहे वाहत ।
काशीविश्वेश्वर तो वसत । ब्रह्मकुंडली सतत पै ॥५९॥
म्हणती जरी तुकया वाराणशीसी । तरी प्रदक्षिणा करुनि ब्रह्मकुमंडलासी ।
तेणे यात्रा सकळ तुजसी । निश्चयेसी घडल्या पै ॥६०॥

मग नमस्कारोनी सोपान । गराडग्राम प्रवरेसी केले गमन ।
चतुरमुख ब्रह्मा पुजोन । तात्काळ प्रदक्षिणे आरंभीले ॥६१॥
नाना देव नाना स्थळे । नाना तीर्थे निर्मळ जळे ।

उत्तर तीरी स्वयंभ सोज्वळ । शिवलिंग केवळ अपार ती ॥६२॥

सिद्ध स्थान बहुत जाण । न गणविती कवणा लागून ।
सोनगांव संगमपूर्ण पुण्य पावन नीरा नदी ॥६३॥
सोनेश्वर संगम प्रसिद्ध । लिंग तेथे असती विविध ।
प्रख्यात हाटकनामे भेद । आत्मविद बोलती त्या ॥६४॥

दक्षिणतीरी मयुरेश्वर । नाभीस्थान वदती सुरनर ।
तेथील महिमेसी नाही पार । यात्रा फार तये स्थळा ॥६५॥
जयपुरीमाजी अखंड । अश्वारुढ मार्तंड ।

तोडो भेदाचे जो बंड । विवेक प्रचंड शस्त्र हाती ॥६६।

शिवस्थान ते अत्याद्‌भूत । दर्शने जीव होती पुनीत ।
भ्रांती मनी पाखांड येत । तया दंडीत निजतेजे ॥६७॥
असो कैलासनाथ तो जेजोरीचा । पुढे पुरंधर पाहिला साचा ।
नारायणरुप विग्रह जियेचा । धृता रचिचा अगाधमहिमा ॥६८॥

तेथून पाहा लिंगे बहूत । दक्षिणतीरी विलसत ।
चतुरमुखी पर्वती समाप्त । प्रदक्षिणा होत सांग पै ॥६९॥
ऐसी करुनी प्रदक्षणा । पुन्हा येवूनी सोपान स्थाना ।

सर्वांभूती अन्नदाना | समाराधना केली पै ||७०||

नंतर आले स्वस्थळासी | कृष्णातीरी बदरीवनासी |
भजन करीती दिवसनिशी | सदा मानसी पांडुरंग ||७१||
अभंग सळई पंच्योत्तरीचे | जे कां राहिले पूर्वावतराचे |
तुकाविप्र ते ही साचे | करुनि वाचे पुजीला हरी ||७२||

जे जे प्राणी दर्शना येती | अनुग्रह देउनी तयांप्रती |
स्वरुपाते मेळविती | दाउनी भक्ती शुद्ध पंथ ||७३||
ऐसा क्रमीता बहुत काळ | साधुस्थाने पहावया आठवले

शिष्येसहीत दीनदयाळ । महाराज निघाले तुकाविप्र ते ॥७४॥

देहु आळंदी चिंचवड । प्रतिष्ठान क्षेत्र परम चोखडे ।
जेथे साक्षात्कार रोकडे । आले कोडे तया स्थळा ॥७५॥
येकनाथ, केशरीनाथ इत्यादिकांचे मठ जेथे ।
ठाई ठाई देवस्थानाते । अवलोकीत चालीले ॥७६॥

म्हाळुंगीग्राम गोंविद सुताराचें । धामणगांव त्या बोधल्याचे ।
लहुळनगर कुर्मदासाचे देखीलें साचे तुकयानी ॥७७॥
गोराकुंभार तेरेत । ते रे ब्रह्य म्हणे जगा ते ।

सावतामाळी होता जेथे । गेला तेथे निजआवडी ।।७८।।

भागानगरी केशवस्वामीं । तेही जावूनी पाहीली भूमी ।
शिवराम समाधी कल्याण ग्रामी । तयें धामी गेले पै ।।७९।।
गुरुघर ग्रामी समाधी । वामनाची ज्या त्रिशुद्धी ।
नामलग्रामी सप्रसिद्धी । गाणपत्य सिद्धी निरंजन ।।८०।।

ब्रह्मनाळ परळी वडगांव । चाफळ त्रिपुटी सद्भाव ।
निर्गुणपूर वदती सर्व । तुक्यानुभव तेथे आले ।।८१।।
तव तये स्थळी श्रीरंग मूर्तिचा । उत्छाह होतसे समाधीचा ।

मेळा मिळाला संतांचा | हर्ष तयाचा जाहला मना ||८२||

जोतीपंत मोरोपंडीत गुंडाजीबाबा थोर संत |
बाबा पाध्ये माहासमर्थ | विठोबा संत चामस्यिे ||८३||
चिंदबर दीक्षित भटजी बोवा | बाबाजी पंत वैराग्य ठेवा |
भवानदास गाती देवा | आले तेधवा निगडीसी ||८४||

रंगनाथ गोसावी राशनकर | लक्ष्मणनाथ वैष्णववीर |
आंदोबाकाका महाथोर | जो का अवतार आनंदाचा ||८५||
मध्वनाथ भुजंगनाथ | शेख सुलतान जो प्रख्यात |

फलटणातील सदाशिवपंत । गोदड बहूत रागीट तो ॥८६॥

श्री रामदास अवतार प्रसिद्ध । जगत्रइ जो कां सिद्ध ।
इत्यादिक पूर्ण सिद्ध । असंख्यवृंदे संतांची ॥८७॥
तुकाविप्र स्वामीसी पाहुनी सकळी । उचंबळला आनंद टाळी पीटीली ।
कीर्तन मूर्ति ते शोभविली । आज्ञापीली सर्वांनी ॥८८॥

म्हणती सारे तुकाविप्रा । श्रवणासी पाजी निरोपण क्षिप्रा ।
तुमचे कथेसी डुले सिप्रा । त्रिनेत्रादी आवड बहू ॥८९॥
ऐसे वदतां संतवृंदी । नमोनी समस्त वैष्णवमांदी ।

संनिध श्रीरंग समाधी । तेचि संधि उभे ठाकले ॥९०॥

मग तो कथेचा अद्भूत रंग । समाधीदूनी प्रगटला श्रीरंग (निजरंग) ।
तये वेळी केला अभंग । होये भवभंग ऐकाता तो ॥९१॥
ऐशा प्रकारे अभंग करुन । भावार्थ वर्णिला असे जाण ।
तये काळी सकळ जन । जाहले लीन परब्रह्मी ॥९२॥

मग इतर गोष्टी कायसी । समाधी डोलली ते वेळेसी ।
आनंद झाला सुखराशी पुष्प वृष्ठीसी करीती ते ॥९३॥
मासामाजी मार्गशीर्ष मास । विभूति वर्णिली जगदीश ।

तयात हरिदीनीचा दिवस | मान्य सर्वास कृष्णपक्ष ||९४||

तुकाविप्रे च्यारीप्रहर | करुनि श्रीहरी पुढे जागर |
वोवाळितां रुक्मिणींवर | आरती स्ववस्त्रे वंदुनी पै ||९५||
अद्यापी तो सांप्रदाय | चालवितो शिष्य पाही |
येका दशीस लवलाही | कीर्तन होये निगडीसी ||९६||

तेथुनी संन्निधकृष्णातीरी | जे का विख्यात ब्रह्मपुरी |
तये स्थानासी निर्धारी निघाले साचारी तुकाविप्र ||९७||
निर्गुणपुरीचा उत्छाह जाहला | प्रार्थीयेले सकळ संताला |

घेउनी गेले ब्रह्मपुरीला । मांडीला काला तेथे पै ॥९८॥

दिनत्रयी आनंदान । आहोरात्र कीर्तन भजन ।
दिंड्या पताका निशाण । कोंदले गगन गजरे त्या ॥९९॥
जेवणारासी नाही गणती । जेथे सिद्धी स्वये राबती ।
अन्नपुर्णा श्री भगवती । तिष्ठे शक्ती पाकशाळे ॥१००॥

विणे मृदंग झणत्कारीती । ठाई ठाई नृत्य करीती ।
स्वर्गीहुनी देव पाहती । पंढरी म्हणती दुजी हे ॥१०१॥
ऐशापरी उत्छाहा सोहळा । वेळअवसेसी गोपाळकाला ।

पुजन करुनि विष्णुपदाला प्रसाद दिधला सकळींका ||१०२||

ब्रह्मपुरीत उत्तमस्थळ | खडकावरी श्री पाउले |
उमटली ती पाहता डोळे | सुखसोहाळे प्राप्त जीवा ||१०३||
कृष्णावतारी श्री भगवान | तये स्थळी खेळले जाण |
स्वहस्ते काला करुन | वाटिला पूर्ण गोपाळा ||१०४||

ते हे जागा पवित्र रम्य | कृष्णातीरी अगाध परम |
तेथे राहती चित्सुखधाम | तुकाराम महाराज पै ||१०५||
ऐसे अनेकस्थळी मठ करुनि | उद्धरीले जेणे प्राणी |

शेवटी केली अपूर्व कर्णी | गुरुचरणी तनु ठेवीली ||१०६||

ऐकता ते संत निर्याण | जीव पावती सकळ कल्याण |
तुकाविप्र जगी धन्य | जाहाला अवतार ||१०७||
शिष्येसहीत आनंदेशी | निघाले महाराज पंढरीसी |
तये वेळी सर्वत्रासी | भजन भीक्षेसी मागती पै ||१०८||

म्हणती आतां हे चि भेटी | आम्हांसी जाणें निज वैकुंठी |
ऐसी सांगुनी सकळा गोष्टी | उठा उठी निघालें ||१०९||
ध्वजपताका झळकती | मार्गी चालता भजन करीती |

येते जाहले सत्वरगती । रुक्मिणीपतीसी भेटावया ॥११०॥

संतासहित पद्मनेत्र । आराधिला तुकाविप्र ।
भेटीसी आले सकळ क्षेत्र । समाप्ती तंत्र ऐकूनी ॥१११॥
आज्ञा मागता देवासी । गहीवरले हृषीकेशी ।
सांगती स्वये रुक्मिणीसी । पंढरीनिवासी सजळनेत्रे ॥११२॥

म्हणें माझा विप्रतुका । सांडुनी मजला जातसे निका ।
लाचाउनी भक्तीसुखा । वियोग दुःखा देतसे की ॥११३॥
मग पोटासी धरुनी निजभक्ता । कुरवाळीले प्रीतीने तत्वता ।

म्हणती तुकाविप्रा काय आता । उत्तीर्णता होऊं मी ॥११४॥

सहा जन्मे भक्ती केली । तयेची मज न बोलवे बोली ।
अनंत जन्मे मागीतली । तुवां बापा ॥११५॥
माझी अनंतपणाची शक्ती । वरीतां जहालासी निजभक्ती ।
वियोगाची फार खंती । मजप्रती वाटतसे ॥११६॥

तुकाविप्रे जोडुनी पाणी । विन विला शारंगपाणी
म्हणें लीलेसाठी ज्ञानखाणी । वियोग मनी न मानिला ॥११७॥
जाणें येणे तुझ्या पाई । तरंग उदधीसी सोडित नाही ।

श्री गुरुसमाधी संन्नीध पाही । अर्पण पाई तनु करणे ॥११८॥

तुकाविप्र प्रार्थीता ऐसे । निघाले संगे जगन्निवास ।
वाद्ये वाजती बहुवस । भजन होतसे प्रेमळ ते ॥११९॥
शिष्यमंडळी समवेत । आले करमळे गावात ।
तेथुनी पुढे चालता पंथ । सिद्धस्थानाते देखिले पै ॥१२०॥

तया स्थाना पाहून । चित्तासी झाले समाधान ।
उपवासिया मिष्ठान्न । निरधना धन ज्या परी ॥१२१॥
असो तुकाविप्र अंजनवतीसी । आले श्रीगुरु समाधीपाशी ।

तेथील संतोष बोलावयासी । वाचा शेषासी थोडक्या ॥१२२॥

मग येकाग्र अंतःकरण । समाधीचे केले अर्चन ।
उभे ठाकले स्वये आपण । कीर्तनासीं जाण तुकाविप्र ॥१२३॥
आजन्म प्रभूति जे जे केले । ते ते चरणी निवेदिले ।
आरती कराया आरंभीले । श्री विप्रनाथ भले स्वामीचे ॥१२४॥

करुनि गुरुदेवाची आरती । ते चि देह्याची समाप्ती ।
पंचप्राण लाउनी ज्योती । सद्‌गुरुप्रती ओवाळीले ॥१२५॥
तुपाची वाटी देणें होती । ते देह्याप्रती कलपिती ।

आयुष्य ते चि निश्चिती । आजब युक्ती केले पै ॥१२६॥

प्राणाची करुनि पंचारती । समर्पिली देहयातीं ।
म्हणुनी जयानी कथेत आरति । जगप्रवृत्ति केलीच नाही ॥१२७॥
ऐसा समारंभ करुन । ज्योतीसी निजज्योती मेळवून ।
सद्‌गुरुपदी होउनी लीन । स्वरुप चिद्‌घनमय जाहाले ॥१२८॥

शालीवाहन शके सोळासे । संवधर नाम असे ।
अनुक्रम तिथी मास । निजधामास गेले पै ॥१२९॥
गुरुदेवा परौता काही । मंत्र देव तीर्थ नाही ।

ती तिही येकें ठाई । नांदती पाही येकत्वे ।।१३०।।

गुरु तोचि देव जाण । तत्वाक्य मंत्रपूर्ण ।
पादोदकतीर्थ पान । करी पावन सकळीका ।।१३१।।
म्हणुनी सर्वस्वे लीन व्हावे । सद्गुरुराया शरण जावे ।
तेणें सकळ सिद्धी पावें । हा अनुभव प्रत्यक्ष ।।१३२।।

महापापी मतिमंद । परीं स्वामीं समर्थ सिद्ध ।
देउनिया निजात्मपद । चरित्र विषद वर्णविती ।।१३३।।
सिद्धकृपा राजारामी । देह्यभान कैचि उर्मी ।

वृत्ति निमग्न सदा ब्रह्मी । स्तवन नेहमी करीतसे ॥१३४॥

भक्त मंजरीमाला ग्रंथ । श्रवणेंची पुरती मनोरथ ।
तुकाविप्र स्वामी आख्यानते । आध्याय समाप्त द्वितीय हा ॥

श्री कृष्णार्पणमस्तु ॥२॥
शुभंभवतु ॥ श्री रामचंद्रार्पणमस्तु । श्री पांडुरंगार्पणमस्तु

This document was created with Win2PDF available at http://www.daneprairie.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.